## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०६/२०१८

**१) टिप्परच्या धडकेत महिलेचा मृत्यु व एक गंभिर जखमी :—**

दिनांक १२/०६/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी महेन्द्र यशवंत नेवारे वय ३५ वर्ष, रा. चिचटोला मोठा भाऊ ईश्वर यशवंत नेवारे वय ३७ वर्ष यांनी घरची मोटार सायकल क्र एमएच ३६ सी ०२९६ ने खुनारी वरुन गावी आई सोबत डब्बलसिट जात असतांना कोलारी गावाचे चौकात मुरमाडी/तुप कडुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टिप्पर हयगयीने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकलला समोरुन कोलारी येथे धडक दिल्याने मोटार सायकलचा चालक हा गंभिर जखमी झाला व आई श्रीमती हिराबाई यशवंत नेवारे वय ५५ वर्ष, रा. चिचटोला ही जागीच मरण पावल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**२) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

**अ)** दिनांक १२/०६/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅझीक वाहन सिंगोरी फाटा येथे सार्वजनिक रोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. नवखरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**ब)** दिनांक १२/०६/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅझीक वाहन आमगाव चौक फाटा येथे सार्वजनिक रोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. नान्हे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**क)** दिनांक १२/०६/२०१८ चे १६.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा मॅझीक वाहन भिलेवाडा टोल नाका जवळ येथे सार्वजनिक रोडवर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भरर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भरर्ले पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**३) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक ०९/०६/२०१८ चे २२.३५ वाजता दरम्यान यातील मृतक घनश्याम शामराव भार्वे वय ३० वर्ष, रा. महाकाली नगर खापा हा दिनांक ०९/०६/२०१८ चे २२.३५ वाजता दरम्यान तुमसर ते तुमसर रोडवर अपघात होवुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचाराकरीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १०/०६/२०१८ चे ०१.३५ वा मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे डॉ. मेमो वरुन मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. अन्वयेचे कागदपत्र पोस्टे भंडारा जाक्र. ३०८१/१८ दिनांक १०/०६/२०१८ चे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राघोर्ते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टरवरुन तोल जावुन खाली पडुन गंभिर जखम झाल्याने युवकाचा मृत्यु :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील मृतक अतुल चेजु भिमसे वय २५ वर्ष, रा. नांदगाव ता. मौदा जि. नागपुर हा ट्रॅक्टरवर बसुन कार्यक्रमात जात असता ट्रॅक्टरवरुन तोल जावुन खाली पडुन गंभिर जखमी झाल्याने त्यास औषधोपचाराकरीता सु. बो. दवाखाना तुमसर येथे नेले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे तुमसर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. धुर्वे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**५) विषारी औषध प्राशन केल्याने महिलेचा मृत्यु :–**

दिनांक ११/०६/२०१८ चे २२.०० ते १२/०६/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. शिल्पा नरेन्द्र धुर्वे वय २१ वर्ष, रा. गोंडीटोला/ आलेसुर ही व तिचे पती नरेन्द्र धुर्वे हे कधी– कधी आपआपसात मध्ये भांडत होते आज रोजी रात्री मुलगा नरेंद्र आणि मृतक सुन शिल्पा यांनी विषारी औषध प्राशन करुन शिल्पा ही मृतअवस्थेत मिळाली व मुलगा नरेंद्र हा बेहोश अवस्थेत मिळाल्यानें फिर्यादी दौलत मानिक धुर्वे वय ५५ वर्ष, यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**६) अनोळखी इसमाचे प्रेत मिळुन आले. :–**

दिनांक ११/०६/२०१८ चे २०.३० ते १२/०६/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पवन नरेन्द्र नगराने वय ३० वर्ष, रा. लाल बहादुर शास्त्री हा काम करतो त्या देशी दारुचे दुकाना समोरील गल्लीतील चिखलात एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० वर्ष, वयोगटातील मृत अवस्थेत पळुन मिळाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी व देशी दारु / अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १२/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, तुमसर, पवनी व लाखांदुर येथे हातभट्टी व देशी दारु अड्डयावर धाडी घालुन ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु किंमती २०००/–रु. ४३५ लिटर ७८० मिली लिटर देशी दारु+ १ स्कॉपिओ गाडी किंमती ६,२५,८९२ /–रु. असा एकुण ६,२७,८९२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८ ) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १२/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०७ तीन सिटर वाहनाकरीता– ०५ ईतर वाहनांवरती – ८८ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिति कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.